(वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेची जाहिरात)

NDVS BANK LTD., NASIK ROAD

दि नासिकरोड देवळाली व्यापारीसहकारी बँक लि., नासिकरोड.

प्रधान कार्यालय, "कल्पवृक्ष", आशानगर, नासिकरोड-422101.

नाशिक जिल्ह्यातील पहिल्या क्रमांकाची अग्रगण्य सहकारी बँकेला लिपिक व शिपाई पाहिजेत

दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक लि., नासिकरोड ही शेडूल्ड बँकेकडे वाटचाल करणारी, नाशिकसह लगतच्या सहा जिल्ह्यांमध्ये कार्यक्षेत्र असलेली प्रधान कार्यालय + ३१ शाखांव्दारे १७०० कोटी व्यवसायाकडे वाटचाल करत असलेली नाशिक जिल्ह्यातील पहिल्या क्रमांकाची अग्रगण्य सहकारी बँक आहे. या **बँकेत लिपीक कम रोखपाल 57 + शिपाई कम ड्रायव्हर 21 असे एकूण 78 पदांकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर भरती प्रकियेत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.** यासंदर्भातील अधिक तपशीलाकरिता **https://sznsbal.com** या वेबसाईटला भेट द्या. सदर परीक्षेसाठी परीक्षा शुल्क रु.750/- + 18% जीएसटी + Applicable Bank Transaction Charges राहतील. सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 18 दिवसांत इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने **दि.07/11/2026 सकाळी 10.00 पासून ते दि.25/11/2026 रोजी** सायं 5.00 वाजेपर्यंत पाठवावेत.

R.No.30797 NASIK ROAD

मुख्य कार्यकारी अधिकारी
दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक लि. नासिकरोड

NDVS BANK LTD., NASIK ROAD
दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक लि., नासिकरोड
प्रधान कार्यालय, ''कल्पवृक्ष'', आशानगर, नासिकरोड - ४२२ १०१.
फोन : ०२५३ - २४६४६४० / २४६५३४५
Email : info@ndvs.bank.in Website : www.ndvs.bank.in

(वेबसाईटवर प्रसिद्ध करावयाचा तपशील)

दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक लि., नासिकरोड ही शेडूल्ड बँकेकडे वाटचाल करणारी, नाशिकसह लगतच्या सहा जिल्ह्यांमध्ये कार्यक्षेत्र असलेली प्रधान कार्यालय + ३१ शाखांव्दारे १७०० कोटी व्यवसायाकडे वाटचाल करत असलेली नाशिक जिल्ह्यातील पहिल्या क्रमांकाची अग्रगण्य सहकारी बँक आहे. या **बँकेत लिपीक कम रोखपाल 57 + शिपाई कम ड्रायव्हर 21 असे एकूण 78 पदांकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर भरती प्रकियेत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.** अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती भरती प्रक्रिया व मार्गदर्शन तसेच पदाकरिता आवश्यक ती शैक्षणिक व इतर अहर्ता तसेच अन्य तपशील **https://sznsbal.com** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

1) **लिपीक कम रोखपाल 57 पदांसाठी व**
2) **शिपाई कम ड्रायव्हर 21 पदांसाठी** भरतीबाबत आवश्यक तपशील पुढीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील	उमेदवाराची शैक्षणिक व वयोमर्यादा पात्रता
1	**लिपीक कम रोखपाल**	1) उमेदवार किमान -मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा. 2) MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. 3) मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांचे ज्ञान आवश्यक. **प्राधान्य -** कोणत्याही सहकारी बँकींग क्षेत्रात किंवा इतर वित्तीय संस्थेत लिपिक पदाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. मराठी व इंग्रजी टायपिंग JAIIB/CAIIB/GDC&A उत्तीर्ण तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची उदा. ICM, IIBF, VAMNICOM इ. तसेच बँकींग/ सहकार/ कायदेविषयक पदविका प्राप्त केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
	उमेदवाराची वयोमर्यादा	उमेदवाराची वयोमर्यादा : 22 ते 35 वर्षे (जाहिरात प्रसिध्द दिवसापर्यंत)
2	**शिपाई कम ड्रायव्हर**	1) किमान १२ वी उत्तीर्ण २) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. 3) चार चाकी वाहन परवाना आवश्यक
	उमेदवाराची वयोमर्यादा	उमेदवाराची वयोमर्यादा : 21 ते 33 वर्षे (जाहिरात प्रसिध्द दिवसापर्यंत)
ऑनलाईन अर्ज सादर करणेचा व इतर अटी व शर्थींचा तपशील पुढीलप्रमाणे		

THE NASIK ROAD DEVLALI VYAPARI SAHAKARI BANK LTD. R.No.30797 NASIK ROAD

अ.क्र.	तपशील	शेरा	
1	ऑनलाईन परीक्षा शुल्क	**750/- + 18% GST + Applicable Bank Charges**	
2	ऑनलाईन परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम **(लिपीक कम रोखपाल व शिपाई कम ड्रायव्हर करीता)**	**General Knowledge, Aptitude, Reasoning, Mathematics, Marathi and English Grammar, Computer Literacy and Banking. Medium of Examination : Marathi & English (English Language questions in English)**	
3	परीक्षेचे स्वरूप व निवड पद्धती	**अ) लिपीक कम रोखपाल**	1) ऑनलाईन परीक्षेचा कालावधी 90 मिनिटांचा राहील. 2) परीक्षा बहुपर्यायी स्वरुपाची असेल. 3) परीक्षा 90 गुणांची राहील. 4) तोंडी मुलाखत 10 गुणांची राहील.
		ब) शिपाई कम ड्रायव्हर	1) ऑनलाईन परीक्षेचा कालावधी 70 मिनिटांचा राहील. 2) परीक्षा बहुपर्यायी स्वरुपाची असेल. 3) परीक्षा 70 गुणांची राहील. 4) तोंडी मुलाखत 30 गुणांची राहील.
4	ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी	दि.07/11/2026 सकाळी 10.00 पासून ते दि.25/11/2026 रोजी सायं 5.00 वाजेपर्यंत	
5	परीक्षा पद्धती	ऑनलाईन	
6	ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी आणि ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्यासाठी **https://sznsbal.com** या वेबसाईट येथे ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत ऑनलाईन परीक्षेबाबत इतर माहिती व नाव नोंदणी वगैरे सर्व तपशील उपलब्ध आहे.		
7	लिपिक, शिपाई पदाच्या भरतीबाबत अटी व शर्ती अथवा इतर कोणतेही बदल करण्याचे अधिकार बँकेच्या व्यवस्थापनास राहतील याची नोंद घ्यावी.		
8	**सदर भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.**		

तरी इच्छुक उमेदवारांनी **https://sznsbal.com** या वेबसाईटवर विहित वेळेत **online** परीक्षा शुल्क भरून **online** अर्ज सादर करावेत. उपरोक्त पदांसाठी उपरोक्त वेबसाईटद्वारे **online** पध्दतीनेच अर्ज करावयाचे आहेत. अन्य कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जाचा आणि फी चा विचार केला जाणार नाही याचीही नोंद घ्यावी.

1) Online पध्दतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया.

1. अर्ज करण्याची पध्दत - **Online** अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना **https://sznsbal.com** संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उमेदवार त्याचा अर्ज **internet** सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल .
2. **https://sznsbal.com** या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करावे.
3. उमेदवाराने इच्छुक पदासाठी रु.750/- परिक्षा शुल्क + 18% जीएसटी + **Applicable Bank Transaction Charges** संकेतस्थळावरुन ऑनलाइन पेमेंट (**Payment Gateway**) व्दारे अदा करावे. परिक्षा शुल्क फक्त ऑनलाइन पेमेंट माध्यमातूनच भरावे लागेल. परिक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे न भरल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल. ऑनलाइन पेमेंट अपडेट होण्याकरिता २४ ते ४८ तास लागू शकतात, उमेदवारांचे पेमेंट अपडेट झाल्यानंतर त्यांनी आपल्या अर्जाची प्रत आपल्याकडे सांभाळून ठेवावी.
4. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने खालील प्रमाणे नजीकच्या काळातील छायाचित्र व स्वाक्षरी ईमेज soft कॉपी स्वत:कडे ठेवावी.

THE NASIK ROAD JEOLALI VYAPARI SAHAKARI BANK LTD. R.No.30797 NASIK ROAD

तपशील	Size limit	Details
अर्जदाराचे अलीकडील पासपोर्ट छायाचीत्र	JPEG FORMAT मधील 20 KB पर्यंत	लांबी X रुदी प्रमाण (PROPORTION) 3.5 CM*4.5cm असावे छायाचीत्र समोर न्येहऱ्याचे असावे. छायाचीत्राचा 75% भाग चेहरा असावा.
अर्जदाराची स्वाक्षरी	JPEG FORMAT मधील 20 KB पर्यंत	को-या पांढ-या कागदावर गडद जाड पॉईट पेनने स्वाक्षरी करावी. 2.5cm*1.5cm असावे

5. उमेदवाराचे फोटो व सही ऑनलाईन अर्ज भरतांना upload करणे आवश्यक आहे. या व्यतीरीक्त इतर कागदपत्रे upload करण्याची गरज नाही, अर्जातील सर्व आवश्यक माहिती भरणे बंधनकारक आहे.
6. अर्जदाराने upload केलेले image सुस्पष्ट नसल्यास त्यास अपात्र ठरविले जाऊ शकते याची नोंद घ्यावी.
7. सदर पेज वरील सर्व माहिती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर submit यावर click करावे.
8. अर्जात भरलेली माहिती परिपुर्ण असल्यास येणा-या मेसेज बॉक्स मध्ये भरती प्रकियेतील पुढील बाबीची (उदा. अर्जाची पात्रता पाहणे, प्रवेश पत्र काढणे.जन्म तारीख वगैरे) माहिती अचुक असल्याची खात्री करावी
9. अर्जात भरलेली माहीती परिपुर्ण असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहिती दुरुस्त करून अचुक भरल्यानंतर save & continue या वर क्लीक करावे. त्यानंतर अर्जाचा id ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याची अथवा विहीत केलेले परिक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख याबाबतची माहिती उमेदवारास दिसेल.
10. तयार झालेले Form Id भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने तो, उमेदवाराने सांभाळुन जतन / नोंद / करुन ठेवावा. यानंतर अर्जात भरलेली माहिती उमेदवाराला बदलता येणार नाही
11. उमदेवाराने अर्जात नमुद केलेली सर्व माहीती व तपशील अचुक असुन कोणतेही माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे प्रतिज्ञा पत्र मान्य करुन submit my form यावर click करावे. त्यानंतर अर्ज सादर होईल.
12. त्यानंतरच्या page वर form id व Mobile No ही माहिती भरुन प्रिंट रिसीट यावर क्लीक् करावे. त्यानंतर उमेदवाराच्या अर्जाची पोच पावती उपलब्ध होईल.
13. E-mail प्राप्त झाल्यावर उमेदवार Form ची पोच पावती काढून घेऊ शकतो.
14. अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत आक्षेप असल्यास **support@sznsbal.com** या ई मेल वर कळवावे.
15. Online परिक्षा उमेदवाराचे कोणतेही कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्याने नंतर कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास, केवळ online परिक्षेस बसू दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.
16. अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.
17. परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारास संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर पत्र पोस्टाने पाठवले जाणार नाही. परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.(उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र)

2) परीक्षा शुल्क :

प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.



परीक्षा शुल्क रु 750/- + **18% GST** + **Applicable Bank Transaction Charges**

वरील प्रमाणे परीक्षा शुल्क + Applicable Bank Transaction charges + 18% GST हे ना परतावा राहतील याची नोंद घ्यावी.

18. सदरची परिक्षा ऑनलाईन पध्दतीने असलेने उमेदवारांनी संकेत स्थळावर प्रसिध्द होणा-या सुचनांची नोंद घेण्यासाठी वारंवार **https://sznsbal.com** या वेबसाईटला भेट देणे आवश्यक आहे.

19. सदर कर्मचारी भरती ही अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांमधून बँकेच्या आवश्यकतेनुसार करण्यात येईल.त्याच प्रमाणे बँकेच्या सेवेत अंतिम निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना बँकेच्या प्रचलित असलेल्या "कर्मचारी भरती - बढती" धोरणातील अटी - शर्ती (उदा. प्रोबेशन कालावधी, प्रोबेशन कालावधीतील रजा, वेतन इत्यादी) त्याच प्रमाणे राहतील.

20. नोकर भरती विषयक सर्वाधिकार बँक व्यवस्थापन राखून ठेवत असून भरती प्रक्रिया संपूर्ण किंवा अंशतः रद्द करण्याचे अधिकार देखील बँक राखून ठेवत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक लि., नासिकरोड